# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेले द्वितीय अपिल क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.११४६/२०२०/अहिल्यानगर मधील शास्तीचे प्रकरण**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.विनायक उर्फ गणेश विलास ठाकूर रा.६५४, तोफखाना, ठाकूर गल्ली, मु.पो.ता.जि.अहिल्यानगर. | सहायक कर निर्धारक व संग्राहक, मालमत्ता करण आकारणी विभाग, अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर ता.जि.अहिल्यानगर. | उपायुक्त (कर), अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर ता.जि.अहिल्यानगर. |

## विवेचन

उपरोक्त द्वितीय अपिलातील दि.२६/०२/२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"मला वॉर्ड क्र.२ मधील बिल (जुना) नंबर ७२६ जागा मालकाचे नाव – वासुदेव रामकृष्ण ठाकूर या मिळकतीचे १९८९ ते २०२० या कालावधीतील परिशिष्ट-अ ची छायांकित प्रत झेरॉक्स स्वरुपात मिळावी. त्या प्रत्येक पानास दोन रुपये फी भरण्यास तयार आहे तरी वरील माहिती लवकर मिळावी."

२. सदर द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दि.११/०८/२०२३ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे आदेश पारित केले होते.

"तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक कर निर्धारक व संग्राहक, अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर यांनी विहित मुदतीत तसेच प्रथम अपिल निर्णयानुसार माहिती न देऊन अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केलेला असल्याने त्यांचेविरुध्द कलम २० मधील तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांची आयोगाचे आदेश प्राप्त होताच आयोगास तात्काळ सादर करावा."

३. आयोगाकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या दि.२६/०२/२०२० रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक कर निर्धारक व संग्राहक, अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर यांनी दि.०३/०३/२०२० च्या पत्रान्वये मालमत्ता क्र.Z२२०७९५४३ या मालमत्तेवर रु.३४८७/- इतकी मालकत्ता कराची थकबाकी आहे. मालमत्ता कराची थकबाकी भरल्याशिवाय परिशिष्ट-अ ची नक्कल देण्यात येवू नये याबाबत मा.आयुक्त साहेब यांनी आदेशित केलेले असल्याने सदरची संपूर्ण थकबाकी भरल्यावर परिशिष्ट-अ ची प्रत देण्यात येईल याची नोंद घ्यावी असे अपिलार्थीस कळविले आहे. तद्नंतर अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर), अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर यांनी दि.०६/११/२०२० रोजी सुनावणीअंती माहिती अधिकारी तथा सहायक कर निर्धारक व संग्राहक यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील उपलब्ध असलेली माहिती ७ दिवसांत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी असे आदेश पारित केलेले आहेत. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक कर निर्धारक व संग्राहक, अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी तथा सहायक कर निर्धारक व संग्राहक, अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर श्री.व्ही.जी.जोशी यांनी आयोगास दि.१०/०८/२०२३ अन्वये दिलेल्या लेखी खुलाशात असे नमूद केले आहे की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेल्या निर्णयानुसार मालमत्ता कर

आकारणी विभाग जा.क्र.२३९१ दि.१५/१२/२०२० अन्वये माहिती देणेकामी इकडील तत्कालीन शिपाई कै.बाळासाहेब कराळे हे समक्ष अपिलार्थी यांचे घरी गेले असता अपिलार्थी यांनी टपाल घेण्यास नकार दिलेला आहे. सोबत सन २०२०/२०२१ या वर्षातील जावक टपाल पुस्तकाची छायांकित प्रत जोडून देण्यात येत आहे.

४. उपरोक्त वस्तुस्थिती पाहता असे स्पष्ट होते की, अपिलार्थी यांचा माहिती अर्ज, प्रथम अपिल अर्ज, प्रथम अपिल आदेश हे सर्व कोविड लॉकडाऊन कालावधीतील आहेत. सदर कालावधीत कार्यालये ही काही वेळ पूर्णपणे बंद होते तर काही वेळ अंशत: बंद होते. प्रस्तुत प्राधिकरणाच्या जावक रजिस्टरवरील नोंदीवरुन अपिलार्थी यांना दि.१५/१२/२०२० व दि.२१/१२/२०२० रोजी टपाल देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो, मात्र सदर टपाल अपिलार्थी यांनी स्वीकारले नसल्याचे दिसून येते. तत्कालीन जन माहिती अधिकारी हे सेवानिवृत्त झाल्याचे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक कर निर्धारक व संग्राहक, अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर यांनी माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही. सबब तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक कर निर्धारक व संग्राहक, अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० अन्वये कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक कर निर्धारक व संग्राहक, अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर (श्री.झिने) यांच्याविरुध्द प्रस्तावित कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२) प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.११४६/२०२०/अहिल्यानगर अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

---

जावक क्र. ell　　　　दिनांक :- 04 FEB 2026

---